## पत्नीचा खून करून फरारी झालेल्या आरोपीस
## गुन्हे शाखा युनिट 5 कडून अटक
## आरोपी करणार होता आत्महत्या

*चारित्र्याच्या संशयावरून आरोपी करीम शाह अहमद शेख वय 64 वर्ष याने रविवार दिनांक 5 जुलै 2020 रोजी सकाळी 830 वा पत्नी हबीदा शेख वय 45 वर्ष हीचा लोखंडी पट्टीने वार करून खून केला व आरोपी देहूरोड परिसरातून फरार झालेला होता . या प्रकरणी देहूरोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर 536 /2020 कलम 302 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता .आरोपी करीम शेख याने आपला व पत्नी चा मोबाईल घटनास्थळावर टाकून पळ काढला होता रविवार पासून पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील गुन्हे शाखा युनिट 5 चे अधिकारी व कर्मचारी हे आरोपीच्या शोधात होते आरोपीचे मुळगाव श्रीरामपूर येथील असल्याने त्या ठिकाणी व पिंपरी-चिंचवड परिसरातील अनेक ठिकाणी आरोपीचा शोध घेण्यात आला .*

*आज दिनांक 7/72020 रोजी खबऱ्या मार्फत युनिट 5 चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री बाळकृष्ण सावंत व सहाय्यक पोलीस निरीक्षक राम गोमारे यांना माहिती मिळाली की आरोपी हा पुणे नगर रोडवरील रांजणगाव परिसरात पिवळ्या रंगाच्या प्लेजर गाडी वरून फिरत आहे , अशी बातमी मिळताच पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांनी पोलीस शिपाई भोसले व स्टाफ ताबडतोब शिक्रापूर येथून परिसरात रवाना केला पोलीस नाईक भोसले व त्यांच्यासोबतचे कर्मचाऱ्यांनी व एक नागरिक श्री मनोज कदम यांचे मदतीने आरोपीला शिक्रापूर परिसरातून ताब्यात घेतले आहे . आरोपीने आपल्या गुन्ह्याची कबुली दिलेली आहे व पत्नीच्या चारित्र्यावर संशय असल्याने तिला त्यापासून परावृत्त करण्याचा आरोपी प्रयत्न करीत होता परंतु पत्नीच्या वागण्यात बदल झाला नाही , याचा राग आल्याने आरोपीने तिच्यावर रविवारी सकाळी साडे आठ वाजताच्या सुमारास लोखंडी पट्टीने वार करून तेथून पळून गेल्याचे आरोपीने कबूल केले आहे . तसेच आरोपीने स्वतःही आत्महत्या करणार असल्याबाबत चिट्टी मध्ये लिहून ठेवली होती व आत्महत्या करण्यासाठी पिवळ्या रंगाची रस्सी विकत घेतली होती , रस्सी व चिट्ठी पोलिसांनी ताब्यात घेतली आहे याप्रकरणी पुढील तपास देहूरोड पोलिस करीत असल्याने आरोपीला देहूरोड पोलीस स्टेशन कडे वर्ग करण्यात आले आहे.*

*ही कामगिरी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई साहेब ,अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे साहेब, पोलीस उपायुक्त गुन्हे शाखा श्री सुधीर हिरेमठ साहेब, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री आर आर पाटील साहेब , यांच्या मार्गदर्शनाखाली*
*गुन्हे शाखा युनिट 5 चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत, सहाय्यक पोलीस निरीक्षक राम गोमारे , पोलीस शिपाई धनंजय भोसले , गाडेकर ,ठाकरे, बनसोडे, खेडकर, ईघारे , माने, फारूक मुल्ला , बहिरट , गुट्टे , पो हवा जाधव , किरनाळे यांचे पथकाने अथक परिश्रम घेऊन केली आहे तसेच या कामी भोसले यांचे सहकारी मनोज कदम राहणार दिघी यांनी ही मोलाची मदत केली आहे .*

## 2- चिंचवड पो स्टे गु र न . 354/19 कलम 302, 34, 143, 144, 147, 148, 149, भा द वि या गुन्ह्यात खून करून दिड वर्षांपासून फरार असलेल्या कुप्रसिद्ध रावन गँग चा सदस्य असलेल्या आरोपीस केली अटक

*चिंचवड पोलीस स्टेशन गु र न 454/19 कलम 302 हा गुन्हा दाखल असून त्यामधील एक आरोपी नाव आकाश विजय पवार वय 24 रा वाल्हेकर वाडी चिंचवड हा खुनाचे घटनेनन्तर फरार झाला होता व तो आजपर्यंत पोलिसांचे गुंगारा देऊन लातूर येथे जाऊन राहत होता व तो आरोपी पिंपरी चिंचवड पोलिसांच्या टॉप 25 वॉन्टेड गुन्हेगाराच्या यादीतील गुन्हेगार होता .*

*यातील आरोपीनी दिनांक 5 /10/19 रोजी रात्री देवीची आरती पाहताना झालेल्या वादावरून अमित सुभाष पोटे याचा कोयता लाकडी दांडक्याने मारहाण करून खून केला होता व हा आरोपी तेव्हापासून फरार झाला होता*

*या आरोपीची माहिती खबऱ्याकडून पोलीस शिपाई शामसुंदर गुट्टे याना मिळाली त्यांनी याबाबत वपोनी बाळकृष्ण सावंत याना सांगितले वर त्यांनी ताबडतोब स पो नि गोमारे , पो शी फारूक मुल्ला बहिरट व गुट्टे यांचे पथक रवाना केले , या पथकाने लातूर येथील मु पो हडोळती, तालुका अहमदपूर , जिल्हा लातूर येथून आरोपी ताब्यात घेतला असून त्याने गुन्हा काबुल केला आहे . आरोपी ला चिंचवड पोलिसस्टेशन च्या ताब्यात देणेत आले आहे*

*या कामगिरी बद्दल पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई साहेब, अपर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे साहेब, पोलीस उपयुक्त श्री सुधीर हिरेमठ साहेब व सहा पोलीस आयुक्त श्री आर आर पाटील साहेब यांनी गुन्हे शाखा युनिट 5 च्या अधिकारी व कर्मचारी यांच अभिनंदन केले आहे .*